सं.फौ.ख.क्र.५१६/२०१३
किसनवीर कारखाना वि. संदीप
नि.क्र.४६ पुढे सुरु.

**फिर्यादीपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु. आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एम.एस. बागवान –**

७. हे म्हणणे खरे आहे की नि.क्र.५१ वरील ठरावाच्या नकलेवर येणेप्रमाणे ठरावाची खरी नक्कल असे याप्रमाणे नमुद असुन त्याखाली प्रभारी कार्यकारी संचालक यांची सही व शिक्का आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.क्र.५१ वरील दस्त मुळ ठराव नाही. साक्षीदार स्वतहुन सांगतो की प्रोसीडींग बुकला ठरावाची नोंद असते. आरोपीकडुन धनादेश स्वीकारणे तसेच त्यास रक्कम अदा करणे ही कामे कारखान्यातील लेखा विभाग करतो. हे म्हणणे खरे आहे की मी सन २००७ पासुन विधी विभागात कार्यरत आहे व लेखा विभाग हा स्वतंत्र विभाग आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.क्र.५१, ५६ व ५९ मधील आरोपीच्या कथीत सहया वेगवेगळया आहेत.

८. हे म्हणणे खरे आहे की कंत्राटदाराला कंत्राट देण्यापुर्वी कारखान्याकडुन उस वाहतुक व तोडणी करारनामा, जामीनपत्र, रक्कम मिळाल्याचा करारनामा व उस तोडणी वाहतुक अग्रीम करीता अर्ज असे दस्तऐवज करण्यात येतात. हे म्हणणे खरे आहे की नि.क्र.५६ वरील करारनाम्यावर लिहुन घेणार व लिहुन देणार म्हणुन आरोपींचीच नावे नमुद आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्या करारनाम्यात र.रु.६,००,०००/– दिल्याचा उल्लेख आहे व त्यात तारीख नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.क्र.५५ वरील उस वाहतुक करारनाम्यावर आरोपीची सही आहे परंतु लिहुन घेणार म्हणुन केवळ कारखान्याच्या पदाधिका–यांच्या पदाचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की जामीनपत्रावर शेती अधिकारी व कार्यकारी संचालक यांच्या सहया आहेत.

***प्रकरण उर्वरीत उलटतपासाकरीता तहकूब.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

वाई.
*स्वाक्षरी/–*
दि.१२.०३.२०२४
(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.२, वाई.